ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई

दरपत्रक सूचना

| अ. क्र. | निर्लेखन करावयाच्या वस्तूचे नाव | अनामत रक्कम (रुपयात) | दरपत्रकधारकाने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई येथे १ भंगार अवस्थेत असलेले चार चाकी वाहन (कार) क्र.एम. एच.०१-५६७८ दिनांक२६/०२/२०१९ ते दिनांक०५/०३/२०१९ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पहावयास मिळेल. | रु.५०००/- | |

अधिष्ठाता, ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील निकामी व निरुपयोगी वस्तूंची वाहनाची विक्रि करण्याकरिता संकेत स्थळावर दि.२६/०२/२०१९ ते दि.०६/०३/२०१९ पर्यंत दरपत्रके मागविण्यात आली आहेत.

१) देकार सादर करणाऱ्या संस्थेने मोहरबंद लिफाफयात दरपत्रक सादर करावे. त्यासोबत अनामत रक्कम (परतावा) रुपये ५०००/- चा डी.डी. अधिष्ठाता, ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई यांच्या नावे देण्यात यावा. व तसेच लिफाफयावर डी. डी. क्रमांकावर नमूद करावे. जेणे करुन डी.डी. सादर केल्याचे स्पष्ट होऊन त्याच संस्थेचा लिफाफा ग्राहय धरुन उघडण्यात येईल.

२) मोहरबंद लिफाफयात निर्लेखित केलेल्या निरुपयोगी वस्तूंची किंमत त्यांच्या समोरिल रकान्यात नमूद करावी रक्कम पूर्ण रुपयात असावी. लिफाफा मोहरबंद नसल्यास ग्राहय धरले जाणार नाही.

३) देकार भरताना त्या सोबत भाग घेणाऱ्या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र व अद्यावत आयकर प्रमाणपत्र सादर करावे. तसेच पॅन क्रमांक किंवा टॅन क्रमांक किंवा जीएसटी क्रमांक नमूद करावा.

४) वरीलप्रमाणे ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई येथे १ नग भंगार अवस्थेत असलेले चार चाकी वाहन (कार) क्र.एम. एच.०१-५६७८ ची पहाणी दिनांक २६ /०२/२०१९ ते ०६ /०३/२०१९ या कालावधीत दुपारी ३ ते ५ या वेळेत करता येईल. त्याकरिता लेखा विभाग ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, प्रशासकिय भवन, ३ रा मजला सर ज.जी समुह रुग्णालये, कॅम्पस भायखळा, मुंबई - ४०० ००८ येथे संपर्क करावा.

५) देकार भरण्याची अंतिम मुदत दि.०६/०२/२०१९ दुपारी ५:०० वाजेपर्यंत आहे. त्यानंतर प्राप्त होणारे देकार विचारात घेतले जाणार नाहित. दिनांक ०८/०३/२०१९ रोजी दुपारी ३:०० वाजता प्रशासकिय इमारत तिसरा मजला, सहयोगी अधिष्ठाता यांच्या दालनात देकार उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचा अधिकार अधिष्ठता, ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई यांचा राहिल.

६) भाग घेतलेल्या देकारामधून उच्चत्तम देकार असणाऱ्या देकाराची निवड करण्यात येईल. प्राप्त झालेली दरपत्रके उघडविल्यानंतर वाजवी उच्चत्तम देकार प्राप्त न झाल्यास प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

७) भाग घेणाऱ्या संस्थेने/ठेकेदाराने त्यांच्या कंपनीच्या अधिकृत लेटरहेड असलेल्या कागदावर देकार बनवून मोहरबंद लिफाफयात सादर करावे. लिफाफयावर निरुपयोगी वस्तूंचे देकार असे स्पष्ट नमूद करावे. तसेच अटि व शर्तीचे पत्रक सर्व अटि मान्य असल्याचे नमूद करुन स्वाक्षरी करुन, देकार सोबत जोडावेत.

८) यशस्वी ठेकेदारास आदेश निर्गमित झाल्यापासून नमूद केलेली देकार रक्कम व अनामत रक्कम ३ दिवसात आगाऊ भरणा करणे बंधनकारक राहिल. त्यानंतर सदर सामुग्री ७ दिवसात उचलावी लागेल. विलंब झाल्यास प्रती आठवडा एकुण किंमतीच्या १ टक्का दंड लागु होईल.

९) यशस्वी ठेकेदारास एकुण किंमतीच्या १० टक्के अनामत रक्कम डी.डी. ने भरावी लागेल. सदर अनामत रक्कम सामानाची उचल केल्यावर सदर कार्यालय स्वखर्चाने स्वच्छ करुन तेथील कचरा उचलून नेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

Scanned by CamScanner

१०) ज्या ठेकेदारास वाहनाची विल्हेवाट लावण्याचा ठेका मिळेल अश्या ठेकेदाराने वाहन निर्लेखन करण्या करिता परिवहन विभागाची परवाणगी घेवून रितसर विल्हेवाट केल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. भंगार अवस्थेतील वाहने वहातूक करणे त्याची योग्य विल्हेवाट लावणे याकरिता लागणाऱ्या विविध विभागाच्या ( उदा.वाहतूक पोलिस विभाग,/ पोलिस विभाग, महानगर पालिका इ.) आवश्यक त्या परवाणगी घेण्याची जबाबदारी सर्वस्वी ठेकेदाराची राहिल. या संबधी असलेल्या सर्व नियामांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

अधिष्ठाता,
ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई

Scanned by CamScanner